21019

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## लेखापरिक्षण विभाग

लेखापरिक्षण अहवाल

2002-03

सन २००३-०४

प्रकरण क्र. १३१ - सन २००३-२००४ या वित्तिय वर्षाचा वार्षिक लेखापरिक्षण अहवाल स्थायी समितीस सादर करणे.

ठराव क्र. - १४३

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ९ चे कलम १०६(३) नुसार मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्य लेखापरिक्षकांनी सन २००३-२००४ या वित्तिय वर्षामधील लेख्यांवरील अहवाल स्थायी समितीस सादर केलेला आहे. या अहवालास मंजूरी देण्यात येत असूनं यातील नमूद सर्व आक्षेपांची पूर्तता संबंधित विभागांनी तात्काळ करून तसा अनुपालन अहवाल मुख्य लेखापरिक्षकांकडे पाठवावा. तसेच तत्कालीन मिरा-भाईंदर नगरपरिषदेचे विशेष लेखापरिक्षण झाले होते तो लेखापरिक्षण अहवाल अजून प्रलंबित आहे. श्री विजय पाटील, तत्कालीन लेखापाल यांनी विशेष लेखापरिक्षण अहवालाच्या अनुपालनासाठी लेखा विभाग व लेखापरिक्षण विभाग यांच्याशी संपर्क साधून एक महिन्याच्या आत कार्यवाही करावी व तसा परिपूर्ण अहवाल महासभेपुढे अवलोकनार्थ ठेवण्यासाठीची कार्यवाही करावी ~~असे हो~~ असे ही स्थायी समिती ठरवित आहे.

सूचक - श्री हेरल बोर्जीस

अनुमोदक - श्री अशोक पाटील

सभापती
स्थायी समिती.

## सन २००३-०४ या वित्तिय वर्षाचा वार्षिक लेखापरिक्षण अहवाल

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ९ चे कलम १०६ (३) नुसार प्रत्येक सरकारी वर्ष सुरु झाल्यानंतर नगरपालिका मुख्यलेखापरिक्षकाने महानगरपालिकेच्या मागील वर्षांच्या संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार सन २००३-०४ या वित्तिय वर्षांच्या लेखापरिक्षण अहवाल मा. स्थायी समितीपुढे ठेवण्यासाठी सादर करीत आहे.

प्रस्तावना-

१) मिरा-भाईंदर महानगरपालिका दि. २८/२/२००२ रोजी अस्तित्वात आली. त्यापूर्वी 'अ' वर्ग नगरपालिका होती. त्यावेळी लेखापरिक्षण महाराष्ट्र शासनाच्या मुख्यलेखापरिक्षक, स्थानिक निधी लेखा या कार्यालयामार्फत केले जात होते. महानगरपालिकेच्या स्थापनेनंतर सदरचे लेखापरिक्षण महानगरपालिकेच्या मुख्यलेखापरिक्षकांमार्फत होत आहे. त्यानुसार जमा रक्कमांचे उत्तर लेखापरिक्षण व खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण केले जाते. पूर्व लेखापरिक्षणामुळे काम सुरु होण्यापूर्वीच अनियमितता निर्दशनास आल्यास त्यावर नियंत्रण ठेवता येते व पालिकेच्या निधीचा संभाव्य गैरवापर टाळता येतो.

तसेच शासन पत्र क्रं. जी.ई. एन १०९९/८२९/प्र.क्र.-४६/९९/नवि-२४ दि.१८/१/२००३ नुसार महानगरपालिकेचे लेखापरिक्षण हे केंद्र सरकारच्या महालेखापरिक्षकांकडूनही होणार असल्याचे कळविण्यात आले आहे. महानगरपालिकेतील लेखापरिक्षण विभागामध्ये मुख्यलेखापरिक्षक, सहा. लेखापरिक्षक व दोन लिपिक कार्यरत आहेत. त्यामुळे जमा रक्कमांचे १००% लेखापरिक्षण करणे शक्य होत नाही परंतु चाचणी लेखापरिक्षण करण्यात आलेले आहे. त्यासंबंधीचे आक्षेप व संबंधित विभागाने त्यावरील खुलासेही दिलेले आहेत. तसेच लेखाविषयक सुधारणा करण्याच्या दृष्टीने काही उपाययोजनाही सुचविलेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे.

प्रलंबित लेखापरिक्षण परिच्छेदाची अदयावत माहिती.

| आरंभीची शिल्लक | दि. ८/१०/०३ रोजी वगळण्यात आलेल्या परिच्छेदांची संख्या | शिल्लक |
|---|---|---|
| ३०६ | ६८-६*= ६२ | २४४ |
| | * उपपरिच्छेद प्रलंबित असलेले परिच्छेद. | |
| २४४ | दि. ७/६/०४ रोजी वगळण्यात आलेले परिच्छेद. ३४+६ उपपरिच्छेद | २१० |

शिल्लक २१० परिच्छेदांबाबत कळविण्यात येते की संबंधित विभागाकडून आक्षेपांचे अनुपालन होणे आवश्यक आहे. यासबंधी संबंधित विभागाकडे सूचना देण्यात याव्यात . (सोबत विभाग निहाय प्रलंबित लेखापरिक्षण परिच्छेदांची अद्यावत माहिती जोडली आहे). (विवरणपत्र-१)

२) **विशेष लेखापरिक्षण अहवालाबाबत (प्रलंबित परिच्छेद- ३६)**

तत्कालिन मिरा-भाईंदर नगरपरिषदेचे दि. २/९/८५ ते २७/२/२००२ या कालावधीचे विशेष लेखापरिक्षण मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी केलेले होते त्याचा अहवाल दि. १०/१/२००३ रोजी निर्गमित केला होता. उक्त अहवाल दि. २४/१/०३ रोजी कार्यालयास प्राप्त झालेला आहे. त्याचा अनुपालन अहवाल चार महिन्याच्या आत मा. महासभेच्या मंजुरीने मुख्य लेखापरिक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य यांना पाठविणे आवश्यक होते. परंतु १ वर्ष ४ महिने होवुनही अहवाल सादर करण्यात आलेला नाही. याबाबत स्पष्टीकरण असे की, तत्कालीन अंतर्गत लेखापरिक्षकांनी सदरचा अहवाल अनुपालन न करताच सचिवांकडे महासभेपुढे ठेवण्यासाठी पाठविला होता. परंतु नंतर ही चुक लक्षात अली असता लेखापरिक्षण विभागाने पुन्हा तो अहवाल परत घेवून अनुपाल्यासाठी सदर आक्षेप तत्कालीन लेखापाल यांचेकडे पाठविण्यात आले. तसेच विशेष लेखापरिक्षणाबाबत पाठपुरावा केला असता तत्कालीन संबंधित लेखापाल श्री. विजय पाटील यांनी लेखी अनुपालन अहवाल सादर केला परंतु त्यासंबंधीचे लेखे लेखापरिक्षण विभागास दाखविले नाहीत. त्यामुळे त्यांच्याशी वारंवार पत्रव्यवहार करुन संबंधित लेखे तपासणीसाठी पाठविण्याबाबत विनंती करण्यात आली परंतु त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले म्हणून सध्याचे लेखापाल यांनाही सदरचे लेखे पाठविण्याविषयी विनंती केली तथापि त्यांनीही श्री. विजय पाटील , तत्कालीन लेखापाल यांना सदरचे लेखे पाठविण्याची विनंती केल्याचे या विभागास कळविले आहे. सदरचे लेखे उपलब्ध होत नसल्याने लेखापरिक्षण विभागाला विशेष लेखापरिक्षणाचा अनुपालन अहवाल मा. महासभेच्या मंजुरीसाठी ठेवणे शक्य होत नसल्याची वस्तुस्थिती मा. स्थायी समितीच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

सदर अहवालाचे अनुपालन तात्काळ करण्याविषयी स्थानिक निधी लेखा कार्यालयाकडुन वारंवार विचारणा होत असल्याने तात्काळ कार्यवाही होणे अपेक्षित आहे. सदर विलंबाबाबत तत्कालीन लेखापालाचा खुलासा घेण्यात यावा अशी शिफारस मा. स्थायी समितीस करण्यात येत आहे. तसेच त्यांचेवर पुढील कार्यवाही होणे अपेक्षित आहे. विशेष लेखापरिक्षण अहवालावरील अनुपालनास श्री. विजय पाटील यांचेमुळे विलंब होत असल्याने या विलंबाची सर्व जबाबदारी त्यांच्यावर निश्चित करण्याची शिफारस करण्यात येत आहे. सदर अहवालाचे अनुपालन लवकरात लवकर मुख्यलेखापरिक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर न केल्यास शासन स्तरावरुन कार्यवाही होऊ शकते त्यामुळे या बाबत तात्काळ निर्णय घेणे आवश्यक आहे.

(क्रमशः)

2

## ३) महालेखा परिक्षकांच्या लेखापरिक्षणाबाबत.

महालेखापरिक्षक, भारत सरकार यांचेकडून सध्या केंद्र व राज्य पुरस्कृत योजना व केंद्र व राज्याकडून मिळणारे अनुदान यांचे लेखापरिक्षण होत आहे.

तसेच शासनाचे दि. १८/१/२००३ च्या पत्रानुसार यापुढे सर्व विभागाचे लेखापरिक्षण, महालेखापरिक्षक, भारत सरकार यांचेकडून होणार असल्याचे कळविण्यात आले आहे.

## लेखाविभाग

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता १९७१ मधील नियम क्रं. ५१ अन्वये सर्वसाधारण रोकडवहीतील लेखे रोजच्या रोज बंद करुन प्राधिकृत अधिका-याने स्वाक्षरी करणे अत्यावश्यक आहे. प्रत्येक महिन्याच्या शेवटी रोकडवहीत जमा व खर्चाच्या रक्कमांची पासबुकाशी तुलना करुन शिल्लकेची जुळणी करुन जर काही फरक असेल तर उक्त नियमातील तरतुदीप्रमाणे रोकडवहीत स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे. माहे मार्च २००४ अखेर सर्वसाधारण रोखवही व विविध बँकांच्या विवरणपत्रानुसार शिल्लक रक्कमेमध्ये खालीलप्रमाणे तफावत निदर्शनास आली. ही तफावत बँक ताळमेळ विवरणपत्र (Bank Reconcillation Statement) बनवून दूर करणे आवश्यक आहे.

| अ.क्र | बँकेचे नांव | सर्वसाधारण रोखवही प्रमाणे शिल्लक | बँक विवरणपत्राप्रमाणे शिल्ल्क |
|---|---|---|---|
| १ | ठाणे जिल्हा बँक | १२७७००७१.४७ | १२१३४३८०.९७ |
| २ | स्टेट बँक ऑफ इंडिया | ६५४५६२२९.२७ | ४१६७५६३१.३५ |
| ३ | विजया बँक | ७१३८६७७.४१ | ७२९६२२६.३१ |
| ४ | इंडियन बँक | ७२०७७८७.०० | ९७७७९२६.०० |
| ५ | देना बँक | २७५६०९७६.०० | ७५०४६२८.०० |
| ६ | एफ.डी.आर | ११६५४५०.०० | - |
| ७ | पोस्ट | २८६४१.०० | - |

लेखा शाखेद्वारे काही प्रकरणी प्रदान स्विकारणा-याकडुन स्वाक्षरी अथवा पावती प्राप्त न करताही प्रदान केल्याचे निदर्शनास आल्याने लेखासंहितेच्या नियम क्रं. १९ व २० नुसार पावती प्राप्त केल्यावरच प्रदान करण्याविषयी कळविले आहे.

तसेच उक्त लेखासंहितेतील नियम क्रं. ३२(२) नुसार प्रदाने रोखीने अथवा धनादेशाद्वारे जसजशी संवितरीत केली जातील तसतशी प्रतिदिन क्रमवार दिनांकासह नोंदण्याविषयी व नियम क्रं ४३ नुसार रोखीने अथवा धनादेशाद्वारे काढलेली ऐखादी रक्कम अप्रदानित रहाते तेव्हा अशी रक्कम नमुना क्रं. २३ प्रमाणे ठेवावयाच्या अदत्त रक्कमांचे पुस्तकात नोंदविण्याविषयी कळविण्यात आले आहे.

लेखा शाखेची तिजोरी भिंतीमध्ये सिमेंटच्या पक्या बांधकामाने बसविण्याचे या शाखेद्वारे कळविण्यात आले आहे.

सोबत २००३-०४ या वर्षातील जमाखर्चाचा गोषवारा ठेवण्यात येत आहे.

## मत्ता व दायित्व

सन २००३-०४ या वर्षअखेरीस रू. १,०२,१०,७०९/- एवढया अग्रिम रक्कमेचे समायोजन होणे बाकी आहे. व या रक्कमा फक्त या वर्षीच्या नसून ब-याच वर्षापासून प्रलंबित आहे. सदर बाब ही लेखापरिक्षणाच्या दृष्टीने अतिशय गंभीर आहे. तरी अग्रिमाची रक्कम संबंधिताकडून व्याजासह वसुल करण्यांत येवुन कार्यवाही करण्यांत यावी.

सन २००३-०४ या वर्षामध्ये शासनाकडून रू. १,९२,२९,०००/- एवढे अनुदान प्राप्त झालेले नाहीं. तरी याविषयी पाठपुरावा करण्यात यावा तसेच प्राप्त झालेला अनुदाना पैकी रु. ७८,६८,०००/- एवढे अनुदान या वित्तिय वर्षामध्ये खर्च झालेले नाही. त्यांमुळे हे अनुदान खर्च न झाल्याने व्यपगत होण्याची शक्यता आहे.

## आस्थापना विभाग

आक्षेप 2 आक्षेप

महानगरपालिकेतील कर्मचा-यांची सेवापुस्तके पडताळणीचे वेळी बरीच सेवापुस्तके अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले. जन्मतारीख, स्वास्थ प्रमाणपत्राच्या नोंदी प्रमाणित केलेल्या नाहीत. सेवापुस्तकातील नोंदी साक्षांकित केलेल्या नसतात. वेतन देयकासोबत दर महिन्याला वेतनवाढ प्रमाण्पत्र जोडण्यात येत नाही. निवृत्ती वेतन धारकांकडून प्रत्येक डिसेंबर व जून महिन्यात हयातीचा/पुर्नविवाह न केल्याचा दाखला घेणे आवश्यक आहे. प्रत्येक कर्मचा-याकडून भ.नि.नि/सेवाउपदाना बाबतची नामनिर्देशनपत्रे भरुन घेणे आवश्यक आहे. नियमानुसार प्रत्येक कर्मचा-यास दुय्यम सेवापुस्तक भरुन देणे आवश्यक आहे. आस्थापना विभागाकडून सध्या विबक्षित महिन्याचे वेतन काढतांना मागील महिन्यातील पंधरा दिवसाचे व चालु महिन्यातील अर्ध्या कालावधीचे वेतन काढण्यात येते ही बाब अयोग्य आहे.

## भविष्य निर्वाह निधी

कर्मचा-याचे भविष्य निर्वाह निधीचे लेखे वित्तिय वर्षांच्या शेवटी जबाबदार सक्षम अधिका-याच्या स्वाक्षरीने बंद करण्यात येवून प्रत्येक कर्मचा-यास वर्षांच्या शेवटी लेखाधिका-याच्या स्वाक्षरीने लेखाविवरणपत्र देणे आवश्यक आहे व त्यासाठी भ.नि.नि विभाग लेखाविभागात संलग्न करण्याची गरज असल्याचे यापूर्वीच कळविण्यात आले आहे. भविष्य निर्वाह निधीच्या दैनिक पुस्तकामध्ये पोस्टाच्या नावे दर्शविण्यात आलेली रक्कम रु. ३०९०/- च्या गुंतवणुकीचे अभिलेखांचा शोध घेणे आवश्यक आहे. भ.नि.नि नामनिर्देशनपत्रे न भरुन घेतल्यामुळे दुर्देवाने कर्मचा-याच्या मृत्युप्रकरणी त्याच्या वारसास देय असलेली रक्कम प्रदानास विलंब होत असल्याने भ.नि.नि नामनिर्देशनपत्रे भरून घेणे आवश्यक आहे.

सध्या शासन नियमाप्रमाणे मनपा कर्मचा-यांना भविष्य निर्वाह निधीवरील रक्कमेवर ८% व्याज देण्यात येत आहे. परंतु त्याचवेळी कर्मचा-यांकडून दरमहा प्राप्त

६

झालेली रक्कम बँकेमध्ये गुंतवणूक केल्यावर जवळपास ५.५०% व्याज प्राप्त होत असल्याने मनपास तोटा होत आहे. मनपास हा तोटा होवू नये यासाठी वेळीच उपाययोजना करणे आवश्यक आहे.

## पाणीपुरवठा विभाग

सन २००३-२००४ या आर्थिक वर्षात पाणीपुरवठा विभागाने पाणीपट्टीची वसुली मागणीच्या तुलनेत ९७% एवढी केली आहे. ही विभागाच्या दृष्टीने निश्चितच स्वागतार्ह बाब आहे.

तसेच पाणीपुरवठा विभागाची महसूली जमा ९३.९४% झाली असून त्याच्या तुलनेत महसूली खर्च ८२.२८% एवढा झालेला आहे.

पाणी पुरवठा विभागाची २००३-२००४ या वर्षासाठी केलेल्या तरतुदीच्या प्रमाणात नवीन जलवाहिनी टाकण्यावरील भांडवली खर्च ४१.२३% व इमारत बांधकाम/मीटर कार्यशाळा गोडावून वरील भांडवली खर्च फक्त १२.६०% झाला आहे. यावरुन असे निदर्शनास येते की २००३-०४ या वर्षामध्ये पाणीपुरवठयाशी संबंधित कामे फार कमी प्रमाणात झाली आहेत अथवा सदर कामासाठी केलेली तरतूद अनावश्यक होती.

महानगरपालिकेतील लेखा परिक्षण विभागाने सदर विभागाच्या कामकाजाच्या दृष्टीकोनातून व अजुनही उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने विभागामधील अनियमितता निदर्शनास आणून दिल्या आहेत.

ब-याच भागातील पाण्याचे मीटर बंद असल्याने सरासरी दरानेच पाणीपट्टी आकारली जात आहे. पाणीपुरवठा देयकांतील सूचनेप्रमाणे आठ दिवसात देयक न भरल्यास पाणीपुरवठा खंडीत करण्याची तरतूद असतांना अशीही प्रकरणे आहेत की ज्यांनी ब-याच वर्षापासून पाणी देयक भरलेले नसतांनाही पाणीपुरवठा खंडीत केलेला नाही. कार्यालयातील शिपाई स्वतः मीटर वाचन घेवून त्याची कच्ची नोंद घेतल्यावर कार्यालयामध्ये पक्की नोंद घेण्यात येते. काही ठिकाणी शिपाई स्वतः नागरिकांकडे जावून वसूली करतात व स्वतःच्या सहीने मूळ पावती देतात व संबंधित पावतीच्या स्थळ प्रतीवर कार्यालयीन लिपिक तदनंतर सही करतात. दिवसभर जमा होणारी रक्कम संबंधित लिपिक स्वतःच्या टेबलाच्या खणामध्ये ठेवतात. त्यासाठी त्यांचेकडे तिजोरीची व्यवस्था नाही तसेच दिवसभरात जमा झालेली रोख रक्कम शिपाई स्वतः सार्वजनिक वाहनाने प्रवास करुन मुख्य कार्यालयात भरतात त्यामुळे रोख रक्कमेच्या सुरक्षिततेच्या प्रश्न उपस्थित होतो. यासाठी कॅश व्हॅन घेतल्यास हा प्रश्न सुटू शकेल.

उत्तन विभागीय कार्यालयाच्या जागेमध्ये बी.एस.ई.एस. चे कर्मचारी त्यांच्या देयकांची वसूली करीत असल्याने त्यांचेकडून भाडे वसूल होणे आवश्यक आहे.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## वार्षिक लेखे सन २००३-२००४
## नमुना क्रं. २७ नियम क्रं. ५९ (१)

जमा बाजू

आकडे लाखांत

| अ.क्र. | लेखा शिर्ष | अर्थसंकल्पिय तरतुद | प्रत्यक्ष जमा | उर्वरित रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १) | महसुली जमा (पाणी पुरवठा) | | | |
| अ | (१) पाणी पट्टी | 1200.00 | 1164.06 | 35.94 |
| | (२) जलउपकरण (पाण्यावरील विशेष कर | 6.00 | 9.21 | -3.21 |
| | (३) नविन नळ जोडणी शुल्क | 700.00 | 663.6 | 36.40 |
| | (४) अनधिकृत नळ जोडणी नियमित | | | 0.00 |
| | करणेचे दंड शुल्क | 80.00 | 66.06 | 13.94 |
| | (५) अनधिकृत नळ जोडणी पाणी वापर | | | 0.00 |
| | सरासरी बील | 67.00 | 16.00 | 51.00 |
| | (६) बोरिंग शुल्क | 15.00 | 15.88 | -0.88 |
| | (७) रस्ता दुरूस्ती शुल्क/रस्ता क्रॉसींग | | | 0.00 |
| | करीता दुरूस्ती | 62.00 | 66.60 | -4.60 |
| | (८) नळ जोडणी स्थानांतरण /दुरूस्ती फी | 12.00 | 14.97 | -2.97 |
| | (९) नळ पुर्नजोडणी/तसेच नळ जोडणी | | | 0.00 |
| | तात्पुरते बंद करणेचे शुल्क | 0.85 | 3.51 | -2.66 |
| | (१०) नळ जोडणी नावात बदल व पाणी | | | 0.00 |
| | वापरात बदल शुल्क | 0.19 | 0.20 | -0.01 |
| | (११) सुपरव्हिजन फी/छाननी शुल्क | 2.00 | 2.70 | -0.70 |
| | (१२)चेक रिटर्न दंड, विलंब दंड, व इतरफंड. | 0.06 | 0.29 | -0.23 |
| | (१३) नळ जोडणी फॉर्म फी | | 3.29 | -3.29 |
| | निविदा फॉर्म फी | 5.00 | 3.16 | 1.84 |
| | (१४) टॅकरद्वारे पाणी पुरवठा | 115.00 | 107.13 | 7.87 |
| | (१५) इतर | - | 0.02 | -0.02 |
| अ-१ | **पाणी पुरवठा एकुण महसुली उत्पन्न** | **2265.10** | **2136.68** | **128.42** |
| २ | मलनि:स्सारण | | | |
| अ | (१) सेप्टीक टॅक फी | 5.00 | 1.81 | 3.19 |
| | (२) विशेष स्वच्छता कर | 30.00 | 22.33 | 7.67 |
| | एकुण मलनि:सारण महसूल | **35.00** | **24.14** | **10.86** |
| अ | एकुण महसुली जमा | **2300.10** | **2160.82** | **139.28** |
| क | असाधारण ऋ ण व निलंबन लेखा | | | |
| | (१) निविदा इसारा रक्कम | 5.00 | - | 5.00 |
| | (२) निविदा सुरक्षा रक्कम | 15.00 | 0.67 | 14.33 |
| | (३) पाणी अनागत | 40.00 | 46.59 | -6.59 |
| | (४) व्याज | - | | |
| | (५) अंशदान पा. पु. राखीवनिधीतून | - | | |
| क | एकुण असाधारण जमा | **60.00** | **47.26** | **12.74** |
| | महसुली जमा | **2300.10** | **2160.82** | **139.28** |
| | असाधारण जमा | **60.00** | **47.26** | **12.74** |
| | अंदाजपत्रक 'क' एकुण जमा | **2360.10** | **2208.08** | **152.02** |

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## वार्षिक लेखे सन २००३-२००४

### नमुना क्र.२७ नियम क्र.५९(१)

(रू. लाखात)

खर्च बाजू

| अ क्र | लेखा शिर्ष | कोड नं | अर्थसंकल्पीय अंदाज | प्रत्यक्ष खर्च | उर्वरित रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| अ | महसुली खर्च पाणी पुरवठा | | | | |
| | (१) पाणी बील Water Charges | 4301 | 1120.00 | 990.87 | 129.13 |
| | (२) स्थायी अस्थापना Gross Salaries Payable | 2509 | 71.69 | 46.59 | 25.10 |
| | (३) अस्थायी अस्थापना | | - | - | - |
| | (४) शासनाला निवृत्ती वेतन अंशदान | | - | - | - |
| | (५) प्रवास भत्ता Travelling Exp. | 4102 | - | - | - |
| | (६) प्रशिक्षण फी Staff Training Exp. | 4107 | - | - | - |
| | (७) छपाई खर्च Printing Exp | 4104 | - | - | - |
| | (८) वितरण व्यवस्था व फिक्सोल्ड खरेदी/दुरुस्ती Repairs and Maintenance -Water Pipelines | 4308 | 150.00 | 92.74 | 57.26 |
| | (९) रिमीएल पावडर व क्लोरीन गॅस Laboratory Testing & Inspection Fees | 4467 | 5.00 | - | 5.00 |
| | (१०) मालमत्ता निगा दुरुस्ती Repairs and Maintenance -Water Stroages tank | 4312 | 2.00 | - | 2.00 |
| | (११) पंपीग स्टेशन फिक्सोल्ड खरेदी व दुरुस्ती Repairs and Maintenance -Water Pumping House | 4314 | - | - | - |
| | (१२)पंपीग व संपग्रह विजदेयक Operating Expenditure Water Pumping House | 4317 | 55.00 | 44.85 | 10.15 |
| | (१३) टॅंकर भाडे Machinery Rent - Water Works | 4319 | 30.00 | 18.23 | 11.77 |
| | (१४) आकस्मित खर्च | | 25.00 | 19.35 | 5.65 |
| | (१५) वाहन इंधन/भाडे/तेल Oil and Fuel Expenses | 4106 | 4.00 | 2.55 | 1.45 |
| | (१६) सुचना प्रसिध्दी करणे | | 0.60 | - | 0.60 |
| | (१७) प्रदुषण नियंत्रण मंडळ फी Pollution Control Charges | 4477 | 30.05 | 30.05 | - |
| | (१८) शहरातील अस्तित्वातील जलवाहिन्यांचा सर्वे करणे. Technical Sanction fee | 4227 | 5.00 | - | 5.00 |
| | (१९) पाणी उपलब्ध करणे सर्वेक्षणी | | 15.00 | - | 15.00 |
| | एकुण "अ" महसुली खर्च | | 1513.34 | 1245.23 | 268.11 |

# वार्षिक लेखे
## संक्षिप्त गोषवारा
## सन २००३-२००४

जमा बाजू

| तपशिल | अर्थसंकल्पिय तरतुद | प्रत्यक्ष जमा | उर्वरित शिल्लक |
|---|---|---|---|
| एकुण 'अ' जमा | 13354.41 | 10381.22 | 2973.19 |
| एकुण 'ब' जमा | 50.00 | - | 50.00 |
| एकुण 'क' जमा | 2360.10 | 2208.08 | 152.02 |
| जमा एकुण अ+ ब+क | **15764.51** | **12589.30** | **3175.21** |
| आरंभीची शिल्लक | **450.89** | **450.89** | **1516.74** |
| एकुण जमा | **16215.40** | **13040.19** | **4691.95** |

खर्च बाजू

| तपशिल | अर्थसंकल्पिय तरतुद | प्रत्यक्ष खर्च | उर्वरित शिल्लक |
|---|---|---|---|
| 'अ' खर्च | 13229.60 | 9972.63 | 3256.97 |
| 'ब' खर्च | 20.00 | 8.00 | 12.00 |
| 'क' खर्च | 2513.40 | 1542.82 | 970.58 |
| खर्च एकुण अ+ब +क | ***15763.00*** | ***11523.45*** | ***4239.55*** |
| अखेरची शिल्लक | **452.40** | **1516.74** | **452.40** |
| एकुण खर्च | **16215.40** | **13040.19** | **4691.95** |

कर विभागात खालील बाबीकडे लक्ष देऊन कार्यवाही करणे आवश्यक आहे.

पोटकीर्दीतील पृष्ठे सक्षम अधिका-याने प्रमाणित करावीत व पोटकीर्द रोजच्या रोज बंद करणे आवश्यक आहे. पावती पुस्तके सक्षम अधिका-याने प्रमाणित करावीत. करदात्यांकडून प्राप्त होणारी रक्कम सर्व विभागातील संबंधित कर्मचारी टेबलाच्या खणामध्ये ठेवतात त्यासाठी प्रत्येक ठिकाणी रोखपेटीची व्यवस्था करण्यात यावी.

दिवसभर जमा झालेली रोख रक्कम शिपाई स्वत: सार्वजनिक वाहनाने प्रवास करुन मुख्य कार्यालयात भरतात त्यास्तव रोख रक्कमेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून उपाययोजना करण्यात यावी. पर्यवेक्षणीय कर्मचा-यांनी आपल्या विभागीय कार्यालयाकडे नियमितपणे लक्ष ठेवणे आवश्यक आहे. विभागीय कार्यालयातील कर्मचारी/शिपाई यांनी कार्यालयीन शिस्तीचे पालन करणे आवश्यक आहे. सन्माननीय करदात्यांसाठी विभागीय कार्यालयात कर भरण्यासाठी उचित व्यवस्था होणे आवश्यक आहे. करदात्यांकडून दुबार

तसेच पावतीपुस्तकांच्या तपासणीचे वेळी खालील अनियमितता निदर्शनास आली.

| अ. क्र | दिनांक | पावती क्र | वसूल केलेली रक्कम | पोटकिर्दित जमा केलेली रक्कम | कमी जमा | ज्यादा जमा | क्षेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९/४/०३ | २५१४९४ | ३२५२५/- | ३२२५०/- | २७५/- | - | संबंधितांनकडून पावती क्रं.३४२५२७दि.१७/२/०४ अन्वये वसूल करण्यात आले |
| २ | २८/५/०३ | २६२९१० | ४५५७५/- | ४५३००/- | २७५/- | | पावती क्रं. ३४२५२८ दि. १७/२/०४ अन्वये वसुली |
| ३ | ७/६/०३ | २६३६०१ | १९००/- | १८००/- | १००/- | - | पावती क्रं. ३४२५२६दि. १७/२/०४अन्वयेवसुली |
| ४ | २४/१/०४ | ३३५७६९ ते ३३५७७२ | - | - | ५००/- | - | कार्यवाही प्रलंबित |
| ५ | २४/१/०४ | ६५६८२ | - | - | ४६२/- | - | कार्यवाही बाकी आहे. |
| ६ | २३/१/०४ | ६५६८१ | - | - | - | ५१४/- | कार्यवाही प्रलंबित |
| ७ | २३/१२/०३ | ३२७५८५ | - | - | - | १२५/- | कार्यवाही प्रलंबित |

पाणीपुरवठा विभाग व लेखाविभाग यांच्या जमा विवरण पत्रामध्ये तफावत दिसून येते ही तफावत दूर करण्याविषयी विभागास कळविण्यात आले आहे.

१ आक्षेप

**कर विभाग**

कर विभागाची २००३-०४ या वर्षासाठी अंदाजाच्या तुलनेत ८१.३१% वसुली झाली आहे. ही वसूली गेल्या वर्षांच्या तुलनेत चांगल्या प्रमाणात झाली आहे. तरी उर्वरीत वसुलीसुध्दा होणे आवश्यक आहे.

कर विभागाने खालील बाबींकडे लक्ष देवून कार्यवाही करणे आवश्यक आहे.

पोटकीर्दीतील पृष्ठे सक्षम अधिका-याने प्रमाणित करावीत व पोटकींद रोजच्या रोज बंद करणे आवश्यक आहे. पावती पुस्तके सक्षम अधिका-याने प्रमाणित करावीत. करदात्यांकडून प्राप्त होणारी रक्कम सर्व विभागातील संबंधित कर्मचारी टेबलाच्या खणामध्ये ठेवतात त्यासाठी प्रत्येक ठिकाणी रोखपेटीची व्यवस्था करण्यात यावी.

दिवसभर जमा झालेली रोख रक्कम शिपाई स्वत: सार्वजनिक वाहनाने प्रवास करुन मुख्य कार्यालयात भरतात त्यास्तव रोख रक्कमेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून उपाययोजना करण्यात यावी. पर्यवेक्षणीय कर्मचा-यांनी आपल्या विभागीय कार्यालयाकडे नियमितपणे लक्ष ठेवणे आवश्यक आहे. विभागीय कार्यालयातील कर्मचारी/शिपाई यांनी कार्यालयीन शिस्तीचे पालन करणे आवश्यक आहे. सन्माननीय करदात्यांसाठी विभागीय कार्यालयात कर भरण्यासाठी उचित व्यवस्था होणे आवश्यक आहे. करदात्यांकडून दुबारा

११

मा० मुख्यलेखा परिक्षक
मिरा-भाईंदर म.न.पा.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

| करांचे नांव | मागणी मागील | मागणी चालू | मागणी एकूण | वसुली मागील | वसुली चालू | वसुली एकूण | थकबाकी मागील | थकबाकी चालू | थकबाकी एकूण | टक्केवारी मागील | टक्केवारी चालू | टक्केवारी एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| घरपट्टी | १२३७४५८९३ | ११९०४२३०९ | ३२२७८८२०२ | ७५४०७३६८ | १८३९५०३९५.५ | २५९३५७६८३.५ | ४८३३८५२५ | १५०९९९९३.५ | ६३४३०५१८.५ | ६०.९३ | ९२.४१ | ८०.३४ |
| वृक्षकर | ५१६३७९९ | ७१२९५८९ | १२२९३३८८ | ३१३५२५७.५ | ६५९१२२५ | ९७२६४८२.५ | २०२८५४१.५ | ५३८३६४ | २५६६९०५.५ | ६०.७१ | ९२.४४ | ७९.११ |
| शिक्षणकर | ३५३७६१५७ | ४६१२८५८६ | ८१५०४७४३ | १८७३९९००.५ | ४२०४२६३८.५ | ६०७८२५३९ | १६६३६२५६.५ | ४०८५९४७.५ | २०७२२२०४ | ५२.९७ | ९१.१४ | ७४.५७ |
| रोजगार | ४१९३२८५ | ४२९७३८५ | ८४९०६७० | १५८६८६१.५ | ३६०५०९९.५ | ५१९९९६१ | २६०६४२३.५ | ६९२२८५.५ | ३२९८७०९ | ३७.८४ | ८३.८९ | ६१.१४ |
| दिवा | ६७६२ | | ६७६२ | ७०६ | | ७०६ | ६०५६ | | ६०५६ | १०.४४ | | १०.४४ |
| स्वच्छता कर | ४०९३६५ | १९५०११८ | २३५९४८३ | ३५४०२३ | १८७९२५१ | २२३३२७४ | ५५३४२ | ७०८६७ | १२६२०९ | ८६.४८ | ९६.३६ | ९४.६५ |
| नोटीस | ३६३६६३५ | | ३६३६६३५ | ११०७२८९.७३ | | ११०७२८९.७३ | २३८८३४३.५ | | २३८८३४३.५ | ५२.४४ | | ५२.४४ |
| व्याज | ४३७८८११० | | ४३७८८११० | १८९७५०६२.५ | | १८९७५०६२.५ | २४८१३०४७.५ | | २४८१३०४७.५ | ४३.३३ | | ४३.३३ |
| एकूण | २९६३२०००६ | २५८५४७९८७ | ४७४८६७९९३ | १२०१०६४८८.७ | २३८०६८५२९.५ | ३५८१७४९९८.२ | ९६८७२५३५.५ | २०४७९४५७.५ | ११७३५१९९३ | ५५.५२ | ९२.०७ | ७५.४२ |

तपासून घ्यावी
आपलेदि ३०/७/७५ रोजी [illegible]

प्र. कर निर्धारक व संकलक,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मत्ता व दायित्व

[illegible] ३१/३/२००७

| उ.क्र | दायित्व | रुपये | एकूण (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | ठेवी (मनपा कडे ठेवलेल्या) | | 619.12 |
| २ | कर्ज (परतफेड न केलेले) | | 7317.44 |
| ३ | प्रलंबित देयके | | |
| | अ) कर्मचाऱ्यांचे वेतन (वेतन आयोग फरक) | 6.94 | |
| | ब) पेन्शन | 1.50 | 8.44 |
| ४ | ठेकेदार/पुरवठादारांची प्रलंबित देयके | | 408.30 |
| ५ | खर्च न केलेले अनुदान वित्त आयोग/आमदार | | 78.68 |
| | खास निधी | | |
| | १) वृक्ष संवर्धन निधी | 63.76 | |
| | २) कर्मचारी निवृत्ती वेतन | 361.80 | |
| | ३) भविष्य निर्वाह निधी | 291.32 | |
| | ४) रस्ता विकास निधी | 0.9 | |
| | ५) वेतन राखीव निधी | 300.27 | |
| | ६) घसारा निधी | 90.06 | |
| | ७) पाणी पुरवठा राखीव निधी | 1432.70 | |
| | ८) कर्मचारी कल्याण निधी | 26.08 | |
| | ९) उड्डाण पुल कर्ज परतफेड निधी | 47.63 | |
| | १०) एम.एम.आर.डी.ए. | 61.13 | |
| | ११) विकास निधी | 23.31 | |
| | १२) पाणी पुरवठा योजना १० एम.एल.डी. कर्ज परतफेड निधी | 424.39 | 3123.29 |
| | | | 11555.27 |

| अ.क्र | मत्ता | रुपये | एकूण (रुपये) |
|---|---|---|---|
| 1 | शिल्लक रक्कम | | |
| | A) हात तील | 6.22 | |
| | B) बँक व तिजोरीतील | 1374.35 | 1380.57 |
| 2 | गुंतवणूक | | 136.18 |
| 3 | वसूल करावयाच्या अग्रिम रकमा | | 102.10 |
| 4 | वसूल न झालेली करांची रक्कम | | |
| | A) थकीत (इमारती वृक्षकर शिक्षण स्वच्छता कर दिवा, पाणीपट्टी) | 533.21 | |
| | B) चालू | 228.53 | 761.74 |
| 5 | मागणी प्रलंबित (भाडे, फी, शुल्क) | | |
| | A) थकीत (जाहिरात, करमणूक, भूईभाडे, होल्डींग, ई. पार्क) | 33.46 | |
| | B) चालू | 48.98 | 82.44 |
| 6 | शासनाकडून मनपा ला देय असलेली अनुदानाची रक्कम | | 192.29 |
| 7 | स्टॅम्प ॲथॉरिटीकडील देय | | 51.20 |
| 8 | खास निधी | | |
| 1 | वृक्ष संवर्धन निधी | 63.76 | |
| 2 | कर्मचारी निवृत्ती वेतन | 361.80 | |
| 2 | भविष्य निर्वाह निधी | 291.32 | |
| 4 | रस्ता विकास निधी | 0.90 | |
| 5 | वेतन राखीव निधी | 300.21 | |
| 6 | घसारा निधी | 90.06 | |
| 7 | पाणी पुरवठा राखीव निधी | 1432.70 | |
| 8 | कर्मचारी कल्याण निधी | 26.08 | |
| 9 | उड्डाण पुल कर्ज परतफेड निधी | 47.63 | |
| 10 | एम.एम.आर.डी.ए. | 61.13 | |
| 11 | विकास निधी | 23.31 | |
| 12 | पाणी पुरवठा योजना १० एम.एल.डी. कर्ज परतफेड निधी | 424.39 | 3123.29 |
| 13 | दायित्वाचे अधिक्य | | 5725.46 |
| | | | 11555.27 |

मागणीची प्रकरणे निदर्शनास आली आहेत. अशी प्रकरणे भविष्यात होणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

पावती पुस्तकांची पडताळणी केली असता प्रत्यक्षात वसूली व मनपा फंडात जमा केलेल्या रक्कमेत खालील प्रकरणी तफावत आढळून आली.

| अ.क्र | दिनांक | पावती क्रं. | वसूल केलेली रक्कम | पोटकीर्दीत जमा केलेली रक्कम | कमी जमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ८/४/०३ | - | ५४०० | ५२९० | ११० | संबंधितांनी पा.क्रं. २८६५९८ दि. १४/११/०३ अन्वयेजमा केली |
| २ | २४/४/०३ | २४५५२३ | ५१२० | ५११० | १० | |
| ३ | १४/१/०४ | ३३२१०० | २० | १० | १० | संबंधित विभागाकडून कार्यवाही बाकी आहे. |
| ४ | १०/३/०४ | ३३२९९५ | १० | - | १० | |
| ५ | ५/३/०४ | ३४७१०१ | १० | - | १० | |
| ६ | ५/३/०४ | ३४७१०२ | १० | - | १० | |
| ७ | १९/१/०४ | ४१३७२० | ५८६५ | ३३८१ | २४८४ | |
| ८ | ३१/३/०४ | ४६०९०७ | २६६२ | २२६२ | ४०० | |
| ९ | ७/१०/०३ | २९७०२० | १० | २० | १० रु. दुबारा नोंद | |

तसेच कर विभाग व लेखाविभाग यांच्या जमा रक्कमेच्या विवरणपत्रात विसंगती दिसून येते. ही विसंगती दूर करण्यासाठी विभागास कळविले आहे.

वाहन विभाग

वाहन विभागाकडे बरीच वाहने असून त्यासाठी लागणारे इंधन व दुरुस्तीवर मोठया प्रमाणात खर्च होत आहे. वाहन विभागातील बरीच वाहने कायम दुरुस्तीसाठी गॅरेजमध्ये असतात त्यामुळे दुरुस्तीचा खर्च सतत वाढत आहे व त्याचवेळी वाहनचालक कामाविना बसून असल्याचे चित्र दिसते. तसेच भाडयाच्या वाहनांसाठीचा खर्च सुध्दा वाढत आहे. शासन निर्णय दि. १/१०/९१ नुसार वारंवार नादुरुस्त होणा-या वाहनांविषयी कार्यवाही करण्यात यावी. या नियमानुसार ज्या वाहनांचे आयुष्य पूर्ण झाले अथवा आवश्यक प्रवास पूर्ण झाला त्या वाहनांबाबत सक्षम अधिका-यांच्या परवानगीने निरुपयोगी ठरविण्याविषयी कार्यवाही करण्यात यावी.

भांडार विभाग

भांडार विभागाने महानगरपालिकेतील सर्व विभागांना कार्यालयाचे दैनंदिन कार्यचालन सुरळित चालण्याच्या दृष्टीने आवश्यक लेखनसामग्री व वस्तूंची खरेदी शासन नियमानुसार करुन पुरविणे अपेक्षित आहे. परंतु ब-याच प्रकरणी चित्र नेमके उलट दिसते.

काही विभाग आपल्या विभागास लागणारी स्टेशनरी स्वतः खरेदी करुन स्वतःच अथवा भांडार विभागाच्या शिफारसीने देयके सादर करतात.

भांडार विभागाने दरवर्षी कार्यालयास लागणारी लेखनसामग्री, वस्तूंची खरेदी विहित मार्गाने दरकरार करुन विविध विभागांना आवश्यकतेनुसार पुरविणेआवश्यक आहे. भांडार विभागाने जँगम मालमत्ता नोंदवहीतील सर्व नोंदी स्वाक्षरीने पूर्ण कराव्यात. नवीन खरेदी केलेल्या जँगम मालमत्तेवर क्रमांक नोंदवावेत. घसारा नोंदवही ठेवण्यात येवून मत्तेची २००३-०४ अखेरची किंमत काढणे आवश्यक आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्रं. १५६ नुसार मालमत्तेची वार्षिक पडताळणी करुन तसे केल्याचे प्रमाणित करण्यात यावे. आंतरविभागीय स्थानांतरणे करतांना लेखासंहितेतील नियम क्रं. १४२(२) अन्वये कार्यवाही करावी. एक्झ्युक्युटीव बॉन्ड पेपर (६४ रीम) ब-याच वर्षापासून निरुपयोगी अवस्थेत पडून असल्याचे निदर्शनास आले. तरी अनावश्यक अथवा जादा प्रमाणात लेखनसामग्रीची खरेदी टाळण्यात यावी.

## वाचनालय विभाग   १ आक्षेप 2003-04

वाचनालयातर्फे अर्ज शूल्क रु. १/-, नोंदणी शुल्क रु. १०/- वार्षिक सभासद शूल्क रु. १००/- व अभ्यासिका शूल्क रु. २/-(वार्षिक ), ठराव क्रं. २४२ दि. २०/८/९३ अन्वये आकारले जात आहे.

इमारतीची झिज, पुस्तकांचा वापर, पाणी व वीज दरातील भाववाढ, कर्मचा-यांचे वेतन या सर्वांवरील खर्चाच्या तुलनेत शुल्कामध्ये वाढ करणे अपरिहार्य वाटते. वाचनालय ही जरी सेवा असली तरी उत्पन्नाच्या दृष्टीने सेवेवरील खर्च अधिक आहे. अभ्यासिकेसाठी जे रु.२/-(वार्षिक) प्रमाणे शूल्क आकारले जात आहे. ते सदय परिस्थितीत नगण्य आहे.

महानगरपालिकेद्वारे, दिलेली जाणारी सेवा ही अगदी तोटयात जावू नये म्हणून काही प्रमाणात शूल्कात वाढ होणे आवश्यक वाटते.

सदया वाचनालय विभागाच्या कर्मचा-यांकडूनच पुस्तकांची मोजणी दर दोन वर्षानी केली जाते. पुस्तकांची मोजणी ही प्रत्येक वित्तिय वर्षाच्या अखेरीस वाचनालय कर्मचा-या व्यतिरिक्त इतर विभागातील कर्मचारी/अधिका-याकडुन होणे आवश्यक आहे.

यावर्षी गहाळ झालेल्या पुस्तकांची किंमत रु. ६०३६/-एवढी आहे तरी याबाबत जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे व पुस्तके गहाळ होण्याच्या कारणांचा शोध घेणेही आवश्यक आहे.

## नगरभवन विभाग   १ आक्षेप

नगरभवनमधील हॉल लग्न व इतर कार्यक्रमांसाठी भाडयाने दिला जातो. या हॉलचे भाडे ठराव क्रं. ५४० दि. २८/२/९६ अन्वये रु.३०००/- लग्नकार्यासाठी व रु. २५१/- इतर कार्यक्रमांसाठी ठरविण्यात आले आहे. सदर हॉलमध्ये अधिक सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने व मुळातच अनुषांगिक बाबींमध्ये झालेल्या भाववाढीच्या दृष्टीकोनातुन हॉलच्या भाडयात वाढ होणे आवश्यक आहे.

हॉलच्या भाडयासोबत सेवाकर म्हणून आतापर्यंत सरसकट रु. २४०/- आकारण्यात येत होता. त्यामध्ये लेखापरिक्षण विभागाकडून सुधारणा सुचविण्यात येवून रु.२४०/- सरसकट न आकारता प्रत्यक्ष भाडयाच्या रक्कमेवर ८% दराने आकारण्याबाबत कळविले आहे.

नगरभवन समोरील तलाव छोटा असलेने बोटिंगसाठी उपयुक्त नाही. यास्तव तेथे बांधा, वापरा, हस्तांतरीत करा तत्वावर देकार मागवून तरण तलाव व बॅडमिंटन हॉलमध्ये अद्यावत व्यायाम शाळा करता येणे शक्य आहे असे केल्यास सदर वास्तुचा व आजुबाजुच्या जागेचा योग्य वापर होईल व नागरिकांनाही उत्कृष्ट दर्जाची सुविधा पुरविता येईल व म.न.पा.च्या उत्पन्नात भर पडेल.

नगरभवनमध्ये जवळपास १००-१५० खुर्च्या तुटक्या अवस्थेत ब-याच दिवसांपासून पडून आहेत तरी त्यांची विल्हेवाट लावून प्राप्त होणारा निधी मनपा फंडात जमा होणे आवश्यक आहे.

नगरभवन इमारतीमधील अग्निशमन यंत्रणा कायम कार्यान्वित असणे आवश्यक आहे.

## अग्निशमन विभाग

१ आक्षेप

अग्निशमन विभागाच्या महसूली व भांडवली खर्च उत्पन्नाच्या तुलनेत भरपूर प्रमाणात आहे. व पुढेही भांडवली खर्चात वाढ अपेक्षित आहे. तरी अग्निशमन विभागाच्या उत्पन्नात वाढ होणे आवश्यक आहे.

अग्निशमन विभागाच्या इमारतीमध्ये पोलीस विभागाचे कार्यालय असून त्यांचेकडून भाडेपोटी रक्कम वसूल करण्यात यावी.

अग्निशमन विभागात ठेवण्यात येणा-या घटना नोंदवहीत नियमाप्रमाणे आवश्यक घटनांची नोंद घ्यावी.

अग्निशमन विभागाने आग विसविण्याचे अथवा विभागाशी संबंधित इतर काम पूर्ण झाल्यावर संबंधितांना पावती देण्याबाबत सूचविण्यात आले त्या नुसार विभागाने माहे एप्रिल २००४ पासून पावत्या देण्यात येतील असे कळविले आहे.

## आरोग्य विभाग

१ आक्षेप

महानगरपालिकेच्या ७९ चौ.कि.मी.क्षेत्रफळामध्ये वॉर्ड साफ सफाई, नालेसफाई कचरा उचलण्यासाठी वाहनांचा वापर व कीटकनाशके मारणे इ. कामे केली जातात. २००३-०४ या वर्षामध्ये आरोग्य विभागाचा ११,९५,७६०००/- एवढया खर्च झाला आहे.

आरोग्य विभागातील कामांचा संबंध थेट नागरिकांच्या आरोग्याशी असल्याने या विभागाने केलेला कामामुळे नागरिकांचे समाधान होणे आवश्यक आहे.

तसेच मनपाच्या क्षेत्रामध्ये नुकतेच दवाखाने उघडण्यात आले आहेत. त्यावरील खर्च रु. ९,६४,०००/- एवढा झाला आहे.

आरोग्य विभागाकडे असलेल्या वाहनांचे व इतर यंत्रसामुग्रीबाबत घसारा काढुन त्यांचेकडील मत्तेची आजची किंमत काढणे आवश्यक आहे.

१५

## जन्म-मृत्यू विभाग

१ आक्षेप

जन्म मृत्यू विभागाद्वारे जन्म व मृत्यूच्या नोंदी घेण्यात येतात परंतु ज्या कागदपत्राच्या आधारे नोंदवहीमध्ये नोंदी घेण्यात येतात ती कागदपत्रे आवश्यकता पडल्यास तातडीने उपलब्ध होणे आवश्यक आहे तसेच जन्म मृत्यूच्या नोंदी ज्या नोंदवहीत घेण्यात येतात त्या नोंदी तात्कालीन निर्बधकांनी स्वाक्षरीत केल्या नसल्याने त्या नोंदीच्या सत्यतेबद्दल खात्री वाटत नाही.

जन्म मृत्यू दाखले घेण्यास येणा-या नागरिकांना दाखले मिळविण्यासाठी कष्ट होवू नये यासाठी त्यांना ठराविक मुदतीत दाखले देण्यात आल्यास त्यांच्या तक्रारींना वाव राहणार नाही.

तसेच पावती क्रं. ३२०२१८ दि. ९/१२/०३ अन्वये रु.१५/- वसूल केले असताना पोटकीर्दीत रु.५/- जमा दर्शविण्यास आली आहे. तरी मनपा फंडात रु. १०/- ने कमी जमा झाली आहे. तरी ती रक्कम सबंधितांनाकडून वसूल करुन मनपा फंडात जमा करण्यात यावी.

## बांधकाम विभाग

१ आक्षेप

महानगरपालिका अंदाजपत्रकात तरतूद आहे म्हणून नवीन कामे प्रस्तावित करु नयेत. व नव्याने कामे हातात घेण्यापूर्वी मागील वर्षातील किती कामे प्रलंबित आहेत, झालेल्या कामांची किती रक्कमांची देयके प्रलंबित आहेत. तसेच कार्यादेश दिलेला परंतु सुरु न झालेली कामे यांचा विचार करुनच नवीन कामे हातात घेण्यात यावी.

बांधकाम विभागाने महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ मधील नमुना क्र. १२८ व १२९ च्या नमुन्यात स्थावर मालमत्ता व जमिनीची नोंद घेणे आवश्यक आहे. तसेच नियम क्रं. १५६ नुसार मालमत्तेची वार्षिक पडताळणी करण्यात यावी.

## जाहीरात कर व भुईभाडे

आक्षेप १ आक्षेप

जाहीरात कराची सन २००३-०४ या वर्षामध्ये अंदाजाच्या तुलनेत फक्त ४१.१९% वसूली झाली आहे. भुईभाडयाची वसुली ही नगण्य झाली आहे. तरी सदर वसुली गांभीर्याने होणे आवश्यक आहे.

जाहीरात विभागाची पावती पुस्तके तपासली असता खालीलप्रकरणी मनपा फंडामध्ये कमी जमा करण्यात आली.

| अ.क्र | पावती पुस्तक क्रं.<br>पावती क्रं. | दिनांक | कमी भरणा | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | ११<br>१०९७ | - | ५.०० | विभागाकडून चलनाद्वारे |
| २ | १५<br>१४४५ | ३१/३/०४ | ८६८.०० | जमा करण्यात आली |
| ३ | १७<br>१६६९ | २९/३/०४ | ५.०० | दि.२६/७/०४ |
| ४ | १८<br>१७५४ | २९/३/०४ | ८.०० | |

१६

<u>जकात विभाग</u> १ आक्षेप

महानगरपालिकेने दि. १७/५/०३ ते दि. १६/५/०४ या कालावधीसाठी जकात वसुलीचा ठेका मे.सहकार एजन्सी या कंत्राटदारास रु. २९,०७,९९,९९९/- एवढया रक्कमेसाठी देण्यात आला होता. सदर कंत्राटदाराकडून बँकगॅरंटीच्या स्वरुपात रु. ५,२२,९८,०००/- एवढया रक्कमेची सुरक्षा अनामत घेण्यात आली आहे. कंत्राटदाराने प्रत्येक आठवडयात रु. ५८,१६,०००/- भरणा करणे आवश्यक होते. त्याप्रमाणे करारनाम्यातील अटीशर्तीनुसार कंत्राटदाराने माहे मार्च अखेरपर्यंत रु. २६,३७,८३,०००/- एवढया रक्कमेच्या भरणा मनपा फंडात केलेला आहे.

<u>महानगरपालिका शिक्षण मंडळ</u> १ आक्षेप

नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं. अमपा- २५०३/५९४/प्र-क्रं-५९/०४ नवि.२६ दि. २०/४/०४ अन्वये नवनिर्मित अकोला, मालेगाव, जळगाव व अहमदनगर महानगरपालिकांना महानगरपालिका स्थापन झाल्याच्या दिनांकापासुन पाच वर्षे पर्यंत 'अ' वर्ग नगरपालिका गृहित धरुन जी अनुदाने अनुज्ञेय होतात त्या दराने देण्याच्या निर्णय झाला आहे परंतु आपल्या महानगरपालिकेस उक्त दराने अनुदान प्राप्त होत नसल्याने महानगरपालिकेस नुकसान होत आहे. तरी शासनाकडुन 'अ' वर्ग नगरपालिका दराने अनुदान प्राप्त होण्याविषयी पत्रव्यवहार व पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे अनियमिततेचे निराकरण करण्यात येवून अनुपालन सादर करण्याविषयी सर्व विभागांना आदेश देण्याची शिफारस मा. स्थायी सभेस करण्यात येत आहे.

# सन २००३-०४ या वित्तीय वर्षाचा अंतर्गत लेखापरीक्षण अहवाल

| अ.क्र. | विभागाचे नांव | परिच्छेद क्र. | एकूण परिच्छेद |
|---|---|---|---|
| १ | लेखा विभाग | १,२ | २ |
| २ | आस्थापना विभाग | ३,४ | २ |
| ३ | पाणीपुरवठा विभाग | ५ | १ |
| ४ | कर विभाग | ६ | १ |
| ५ | वाहन विभाग | ७ | १ |
| ६ | भांडार विभाग | ८ | १ |
| ७ | वाचनालय विभाग | ९ | १ |
| ८ | नगरभवन विभाग | १० | १ |
| ९ | अग्निशमन विभाग | ११ | १ |
| १० | आरोग्य विभाग | १२ | १ |
| ११ | जन्म मृत्यू विभाग | १३ | १ |
| १२ | बांधकाम विभाग | १४ | १ |
| १३ | जाहिरात विभाग | १५ | १ |
| १४ | जकात विभाग | १६ | १ |
| १५ | शिक्षण विभाग | १७ | १ |
| | | एकूण | १७ |

- 6 Updated
10 Pending.

○ Updated